राज्य शासनाचे मंत्री, अधिकारी, राज्य विधान मंडळाचे सदस्य आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम मंडळे, महामंडळे इत्यादींचे पदाधिकारी यांच्या विदेश दौ-यासंबंधी मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक, क्रमांक-सीडीआरर-१०९६/२२४/प्र.क्र. १५/९६/११,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- १३ नोव्हेंबर १९९६

वाचा:- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआरर-१०९५/३७०/ प्र.क्र. १०/९५/११, दिनांक ११ ऑक्टोबर, १९९५.
२] शासन पृष्ठांकन, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-सीडीआरर-१०९६/२२४/ प्र.क्र. २५/९६/११, दिनांक १५ एप्रिल, १९९६.
३] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआरर-१०९६/२२४/ प्र.क्र. १५/९६/११, दिनांक १३ सप्टेंबर, १९९६.

## शासन परिपत्रक

संदर्भाधीन परिपत्रकान्वये तसेच पृष्ठांकनान्वये राज्य शासनाचे मंत्री व अधिकारी, राज्य विधान मंडळाचे सदस्य आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींचे पदाधिकारी यांच्या विदेश दौ-यासंबंधात सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच केंद्र शासनाने विदेश दौ-यासंबंधात विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे कटाक्षाने पालन करण्याबाबतही सूचना देण्यात आलेल्या आहेत. विदेश मंत्रालयाने आता असे निदर्शनास आणले आहे की, परदेश दौ-यातील अधिका-यांनीही किंवा लोक प्रतिनिधींनी निश्चित केलेल्या बैठका किंवा संमेलने [ Seminar ] ऐनवेळी रद्द करण्यामुळे किंवा पुढे ढकलल्यामुळे परदेशातील भारतीय दुतावासास गैरसोयीचे किंवा पेचात टाकल्यासारखे होते. केंद्र शासनाने असेही निदर्शनास आणले आहे की, शेवटच्या क्षणी असे बदल जरी काही अपरिहार्य कारणामुळे करावे लागत असले तरी त्यामुळे परदेशातील भारतीय दुतावासास अशा बैठकी पुन्हा आयोजित करणे अहितकारक ठरते व त्यामुळे पर्यायाने भारताच्या व विशेषत्वाने त्या आस्थापनेच्या प्रतिमेलाही धक्का पोहोचतो. केंद्र शासनाने अशा सूचना दिल्या आहेत की, आमंत्रणे स्वीकारताना किंवा भेटी ठरविताना संबंधितांनी सर्व प्रकारची आवश्यक ती काळजी घ्यावी. पूर्व मान्यता घेतल्याशिवाय आमंत्रण स्वीकारू नये अथवा भेटी आयोजित करणे टाळावे. जर शेवटच्या क्षणी बदल करणे अनिवार्य ठरले तर लवकरात लवकर त्याबाबतच्या सूचना संबंधीतांना त्वरित व नंतर उचित पत्रव्यवहाराद्वारे सुयोग्य मार्गाने संबंधितांकडे व्यक्त केल्यास

क.मा.प.

त्यामुळे प्रतिकूल व नकारात्मक संकेत सौम्य होतील.

सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, वर नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे तसेच या सूचना त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सार्वजनिक क्षेत्रातील सर्व उपक्रम, मंडळे, महामंडळे, सर्व सांविधिक तसेच शासकीय, निमशासकीय संस्था यांच्या निदर्शनास आणून याव्यात व त्यांच्याकडून त्याचे अनुपालन होण्याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ ज. द. ठाकूर ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा] मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान सभा सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान परिषद सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, का.क्र. २१ब १९,३० [र.शि.]
इतर सर्व मंत्रालयीन विभाग.

* पत्राने.